# नोंदणीकृत कामगारांना घरकुल देणार : डॉ. सुरेश खाडे

औरंगाबाद, दि. ६ : राज्याच्या विकासामध्ये कामगार हा महत्वाचा घटक असून शासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. कामगारांचा घराचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रधानमंत्री घरकुल योजनेंतर्गत नोंदणीकृत कामगारांना घरकुल देण्यात येणार. यासाठी गायरान, गावठाण तसेच एमआयडीसीमध्ये असणाऱ्या जमिनींचे सर्वेक्षण करण्यात येत आहे. प्रधानमंत्री घरकुल योजनेंतर्गत घरकुलासाठी अडीच लाख रुपये मिळतात यामध्ये कामगार विभागाकडून प्रत्येक घरकुलासाठी दोन लाख रुपये देऊन नोंदणीकृत कामगारांना घरकुल देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात येत असल्याचे कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी जाहीर केले.



जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित कामगार विभागाच्या औरंगाबाद विभागीय आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीला कामगार विभागाचे प्रधान सचिव विनिता वेद सिंघल, कामगार आयुक्त सुरेश जाधव, उपसचिव दादासाहेब खताळ, सहसंचालक राम दहिफळे आदी अधिकारी उपस्थित होते.

कामगार विभागाची सर्व कार्यालये एकाच छताखाली आल्यास प्रशासकीयदृष्ट्या कामकाज करणे सोईचे होणार आहे. म्हणून प्रत्येक जिल्ह्यात कामगार भवन बांधण्यात येणार असून हे काम दर्जेदार आणि कालबद्धरित्या पूर्ण करण्यासाठी योग्य नियोजन करा. कामगार भवन उभारण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात किमान १ ते २ एक्कर जागा निवडावी. जागा निवडतांना कामगारांची सोय पहावी. या इमारतीमध्ये जिल्हा कार्यालय व विभागीय कार्यालय अशी स्वतंत्र व्यवस्था करावी. शक्य असल्यास एमआयडीसी सारख्या ठिकाणी जागा निवडा. कामगार भवनचे भुमिपूजन जानेवारी महिन्यात होईल यादृष्टीने कालबद्धरित्या नियोजन सर्व अधिकाऱ्यांनी करावे, असेही डॉ. खाडे यांनी सांगितले.

औरंगाबाद विभागातील कामगार विभागाच्या जिल्हा तसेच अन्य कार्यालयाची जागा, विभागातील रिक्त पदे, प्रलंबित प्रकरणे व निपटारा झालेल्या प्रकरणांचा आढावा घेऊन प्रलंबित प्रकरणे डिसेंबर महिन्याच्या शेवटपर्यंत मार्गी लावावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. पूर्वी कामगार नोंदणी करण्यासाठी २५ रुपये नोंदणी फी होती. ही फी कमी करुन आता केवळ १ रुपयांमध्ये कामगार नोंदणी करण्यात येणार असल्याने अधिकाधिक कामगारांनी नोंदणी करावी, असे आवाहनही डॉ. खाडे यांनी केले.

## डोंगराळ प्रदेशातील दळण-वळण चांगले असणे महत्त्वाचे : शंभूराज देसाई




सातारा, दि. ६ : डोंगराळ भागात दळण वळण चांगले असणे महत्त्वाचे आहे. ही गरज समजून डोंगरात वसलेल्या प्रत्येक गावांपर्यंत रस्ते पोहचविण्याचे काम लोकप्रतिनिधी म्हणून केल्याचे प्रतिपादन पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी केले. पाटण तालुक्यातील भोसगाव ते अंब्रूळकरवाडी रस्त्याच्या भूमिपूजन कार्यक्रमावेळी ते आज बोलत होते.

ग्रामीण भागाच्या विकासासाठी चांगल्या रस्त्यांची आवश्यकता असल्याचे सांगून पालकमंत्री देसाई म्हणाले, पाटण तालुक्यातील ७० टक्के भाग हा डोंगराळ आहे. या सर्व भागात आता पक्के रस्ते पोहचले आहेत. तालुक्यातील विकासाची ही कामे नागरिकांसाठी महत्त्वाची आहेत. लोकप्रतिनिधी म्हणून लोकांना सुविधा पुरविण्याचे काम करत असल्याचेही ते यावेळी म्हणाले.

अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्यात येत आहेत. शेतकऱ्यांना मदत करणे ही शासन म्हणून आमची जबाबदारी आहे. म्हणूनच शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपये प्रती शेतकरी निधी देण्यात आला आहे.

जिल्ह्यातील प्रश्न सोडवण्यासाठी सर्व प्रयत्न करणार आहे. मराठवाडी धरणाच्या पुनर्वसनाचा प्रश्न लवकरच सोडविण्यात येईल. विकास कामांसाठी निधीची कमतरता पडू देणार नाही, असेही पालकमंत्री देसाई म्हणाले.

## अमरावती जिल्ह्यातील दहा कृ.उ.बा.स.त १७ हजार मतदार निवडणार संचालक मंडळ

अमरावती, दि. ६ : जिल्ह्यातील दहा बाजार समितींसाठी जानेवारीत होणाऱ्या निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार यादीच्या प्रारूपांत १७,७७४ मतदारांचा समावेश आहे. धारणी व तिवसा या बाजार समितीच्या निवडणुकांचा निर्णय प्राधीकरणावर आहे.

दरम्यान, सहकार क्षेत्रातील दिग्गजांची निवडणुकीच्या दृष्टीने मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. अंतिम मतदार यादी ७ डिसेंबरला प्रसिद्ध होणार असून त्यामध्ये मतदार संख्येत बदल होण्याची शक्यता आहे.




अठरा संचालक असलेल्या बाजार समितीच्या संचालक मंडळातसेवा सहकारी संस्था मतदारसंघातून दोन व एक संचालक हमाल मापारी

अकरा, ग्रामपंचायत मतदारसंघातून चार, अडते व व्यापारी मतदारसंघातून निवडल्या जातात.बाजार समितीच्या संचालक मंडळाची मुदत संपुष्टात आल्यानंतरही कोरोना संक्रमणामुळे मुदतवाढ देण्यातआल्याने या निवडणुका लांबल्या आहेत. राज्य सहकारी प्राधिकरणाने आता त्या जाहीर केल्या असून २९ जानेवारीस मतदान होणार आहे. अमरावती व दर्यापूर या बाजार समितीत सर्वाधिक मतदार आहेत. अमरावतीमध्ये ३५९७ तर दर्यापूरमध्ये २३०४ मतदारांची नोंदणी आहे.

## स्थलांतरित पालकांनी हंगामी वसतीगृहात पाल्यांचे प्रवेश करावेत - परभणी जिल्हाधिकारी

परभणी, दि. ६ : परभणी जिल्ह्यातील एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी समग्र शिक्षा अभियानांतर्गत ऊसतोड, विटभट्टी, दगडखाण आदी कामांसाठी गावातून तात्पुरते स्थलांतरित होत आहेत, अशा पालकांनी त्यांच्या पाल्यांचे संबंधित जिल्हा परिषदेच्या शाळेतील अनिवासी हंगामी वसतीगृहात प्रवेश करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी आंचल गोयल यांनी केले आहे.

परभणी जिल्ह्यातील नऊपैकी सहा तालुक्यात एकूण ४९ अनिवासी हंगामी वसतीगृह सुरु करण्यासाठीचे




या वर्षासाठीचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. यामध्ये एकूण ३ हजार १७३ विद्यार्थी प्रवेशित होणार आहेत. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये हंगामी स्थलांतरित होणाऱ्या ऊसतोड मजूर, विटभट्टी, दगडखाण मजूर हे या व इतर कामासाठी स्थलांतरित होत असतात. या स्थलांतरित होणाऱ्या मजुरांच्या मुलांच्या शिक्षणाची हेळसांड होऊ नये म्हणून गावातच हंगामी वसतीगृह संबंधित जिल्हा परिषद शाळेच्या शाळा-व्यवस्थापन समितीमार्फत नियमित शाळेतच चालविले जाते. अशा मुलांना रात्रीचे भोजन व सकाळचा नाश्ता, माध्यान्ह भोजन शाळेतच उपलब्ध करुन दिले जाते.

तर संबंधित मुलांच्या नातेवाईकाकडे किंवा त्यांच्या घरामध्ये निवासाची व्यवस्था केलेली असते, अशी माहिती जिल्हाधिकारी गोयल यांनी दिली असल्याचे जिल्हा परिषदेच्या प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी रश्मी खाडेकर यांनी सांगितले.

## केंद्र सरकारच्या बांबू लागवड सल्लागार समितीवर पाशा पटेल यांची नियुक्ती

लातूर, दि. ६ : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्र बांबू लागवड चळवळीला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाच्या अखत्यारीत बांबू लागवड सल्लागार समितीचे गठन केले आहे. या समितीत सदस्य म्हणून बांबू लागवड चळवळीचे प्रणेते तथा महाराष्ट्र कृषी मूल्य आयोगाचे माजी अध्यक्ष पाशा पटेल यांचा समावेश करण्यात आला आहे. यापूर्वी पाशा पटेल यांचा केंद्र सरकारच्या व्यापार मंडळ, झिरो बजेट अर्थात शून्य खर्चावर आधारित शेती संबंधित झिरो



बजेट शेती समितीवर नियुक्ती केलेली असून, आता बांबू लागवड सल्लागार समितीवर त्यांची नियुक्ती करून केंद्र सरकारने विश्वास दाखवत त्यांच्या कार्याची पावती देत त्यांच्यावर तीन मोठ मोठ्या जबाबदाऱ्या सोपविल्या आहेत.

# पुलाचे नाव ठेवले 'बिरबलची खिचडी'




हिंगोली, दि. ६ : गेल्या चार वर्षांपासून खटकाळी रेल्वे क्रॉसिंग वर उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. सदर काम अतिशय संथ गतीने सुरू असल्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. ज्याप्रमाणे बिरबलची खिचडी कधी शिजणार? असा प्रश्न निर्माण झाला होता, त्याचप्रमाणे हा पूल कधी होणार? असा प्रश्न निर्माण झाला आहे. यामुळे वैतागलेल्या नागरिकांनी सदर पुलाचे बिरबल का पूल असे नामकरण करून उपरोधिक आंदोलन केले आहे.

हिंगोली-कळमनुरी मार्गावर हिंगोली नजीक खटकाळी रेल्वे क्रॉसिंग जवळ चार वर्षापासून उड्डाण पुलाच्या निर्मितीचे काम सुरू आहे. सदर काम कंत्राटदाराकडून अतिशय संथ गतीने केल्या जात आहे. त्यातच आता जिल्हाधिकारी यांनी पुलाखालील मार्ग बंद केला असून खटकाळी हनुमान मंदिराजवळील रेल्वे पटरी खालून जाणारा अरुंद रस्ता उपलब्ध करून दिला आहे. यामुळे या ठिकाणी वारंवार वाहतूक कोंडी होत असून त्याचा नागरिकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. पुलाच्या कामाची गती पाहता हा पूल नागरिकांच्या सेवेत कधी तयार होईल? हा गंभीर प्रश्न आहे. ज्याप्रमाणे बिरबलाची खिचडी कधी शिजलीच नव्हती त्याप्रमाणे हा पूल कधी पूर्ण होणार यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. परिणामी वैतागलेल्या हिंगोलीतील नागरिकांनी शनिवारी सदर पुलाचे 'बिरबल का पूल' म्हणून नामकरण करीत उपरोधक आंदोलन केले आहे.

यामध्ये सुनील राठोर, शेख नसीर, विजू राठनालु, संजय बांगर, शेख फारुख, मुदिराज, परमेश्वर वाघमारे, उमेश तेलगोटे यांनी सहभाग नोंदविला. यानंतर तरी प्रशासनाला जाग येऊन पुलाचे काम गतीने व्हावे अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## उस्मानाबाद एसटी महामंडळाला यंदाची दिवाळी पावली

उस्मानाबाद, दि. ६ : दोन वर्षांनंतर कोरोनापासून सुटका मिळाल्याने यंदा दिवाळीच्या हंगामात गावी जाण्यासाठी व परत पुणे, मुंबईला येण्यासाठी उसळलेल्या गर्दीमुळे उमरगा आगाराची चांगलीच चांदी झाली आहे.

दरवर्षी दिवाळी सुट्या लागल्या की, अनेक जण आपापल्या गावी जातात. त्यामुळे दिवाळी सणापूर्वी व दिवाळी सण संपताना प्रवाशांची गर्दी होते. यंदा एसटी महामंडळाने ही दिवाळीची तयारी १५ दिवस अगोदर सुरू केली. गाड्या दुरुस्त करून घेतल्या. त्याचबरोबर प्रत्येक गाडी वेळेत मार्गावर सुटतील, असे वेळेचे नियोजन केले. त्यानुसार आगारांनी अंमलबजावणी केली आणि त्याचे फळ म्हणून एसटीच्या सर्वच गाड्यांना प्रवाशांचा प्रतिसाद लाभला.



दिवाळीच्या गर्दीचा हंगाम पाहता महामंडळाने आपल्या प्रवासी दरात १० टक्के दरवाढ केली होती. दिवाळीत गावी जाण्यासाठी तसेच ऑक्टोबर महिन्यात जोडून आलेल्या सुट्टयांमुळे पर्यटनासाठी जाणार्या प्रवाशांच्या सोयीसाठी एसटी महामंडळाने यंदा राज्यभरात नियमित बस फेर्यांबरोबरच जादा गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला होता. या दरवाढीनंतरही प्रवाशांनी आपल्या लालपरीवर म्हणजेच एसटीवर विश्वास दाखवत प्रवास केला. पुणे, मुंबईला जाणाऱ्या सर्वच कंपन्यांचे ट्रॅव्हल्स हाऊसफुल्ल आहेत. अन्य राज्यातून उमरगामार्गे जाणाऱ्या अनेक गाड्यांही उमरग्यात न थांबता थेट पुणे, मुंबईकडे जात आहेत. शिवाय अनेक प्रवासी खासगी बस, खासगी गाड्यांचाही आधार घेत आहेत.

उमरगा आगाराच्या बसेसनी २१ ते ३१ ऑक्टोबर या दिवाळीच्या अकरा दिवसीय कालावधीत एकूण १ हजार ४४४ फेऱ्या केल्या. यातून ३ लाख १९ हजार १५१ कि.मी. लालपरीची चाके फिरली. यातून १ लाख ७३ हजार ९६४ प्रवाशांनी प्रवास केला. यातून उमरगा आगारास १ कोटी ३० लाखाचा महसूल मिळाला असल्याचे आगारप्रमुख प्रसाद कुलकर्णी यांनी सांगितले.

## सेवानिवृत्त अप्पर आयुक्त गगराणी यांना ९ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी

नांदेड, दि. ६ : मिळकती पेक्षा जास्त अपसंपदा जमविल्या प्रकरणी सेवानिवृत्त अप्पर जिल्हाधिकारी तथा नांदेड महापालिकेचे तत्कालीन अप्पर आयुक्त राम नारायण गगराणी आणि त्यांच्या पत्नी जयश्री गगराणी यांना अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस.ई. बांगर यांना ९ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. सेवानिवृत्त अप्पर जिल्हाधिकारी, अप्पर आयुक्त नांदेड वाघाळा शहर महापालिका, हिंगोली विविध पदावर काम केलेले राम नारायण लक्ष्मीनारायण गगराणी यांच्याविरुद्ध १ मार्च २०१० ते ३० जून २०१६ दरम्यान भ्रष्टाचाराच्या माध्यमातून अपसंपदा जमविली असल्याची तक्रार करण्यात आली होती. याबाबत लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने गगराणी आणि परिवाराची खुली चौकशी केली होती. या चौकशीत त्यांच्याकडे संपत्तीच्या ज्ञात स्तोत्रा व्यतिरिक्त ४५ टक्के जास्त संपत्ती सापडली. याप्रकरणी वजीराबाद पोलीस ठाण्यात शुक्रवारी रामनारायण गगराणी जयश्री राम नारायण गगराणी, मुलगा प्रथमेश गगराणी या तिघा विरुद्ध भ्रष्टाचार धक अधिनियमानुसार गुन्हा दाखल झाला आहे. न्यायालयाने गगराणी पती-पत्नीला ९ नोव्हेंबर पर्यंत पोलीस कोठडीत पाठविले आहे.

## कौशल्य प्रशिक्षणात सर्वतोपरी प्रयत्न करा : नवीन पटनायक

भुवनेश्वर, दि. ६ : ओडिशाचे मुख्यमंत्री आणि बिजू जनता दल प्रमुख नवीन पटनायक यांनी स्टुडंट एक्स्चेंज प्रोग्रामचा एक भाग म्हणून ७ ते १८ नोव्हेंबर या कालावधीत सिंगापूरच्या इन्स्टिट्यूट ऑफ टेक्निकल एज्युकेशनमध्ये कौशल्य वाढवण्यासाठी सिंगापूरला रवाना होणाऱ्या वर्ल्ड स्किल सेंटरच्या ४० विद्यार्थ्यांची भेट घेतली. विद्यार्थ्यांमध्ये ३२ मुले आणि ८ मुली असून त्यापैकी २० शेतकरी कुटुंबातील आहेत.मुख्यमंत्र्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या, त्यांची पूर्ण क्षमता जाणून घेण्यासाठी त्यांना प्रेरणा दिली आणि जगात प्रथम क्रमांकावर येण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यास प्रोत्साहित केले.

विद्यार्थी खदए मध्ये २ आठवड्यांच्या कार्यकाळाचा अनुभव घेतील, विविध कार्यक्रमात पूर्णपणे व्यस्त राहतील आणि तेथे शिकणाऱ्या तरुणांच्या सामाजिक-सांस्कृतिक पैलूंशी परिचित होतील.

## संग्रामनगर उड्डाणपुलाखाली ५२ अनधिकृत नळ तोडले

औरंगाबाद, दि. ६ : मागील काही दिवसांपासून महापालिकेने शहरातील अनधिकृत नळ कनेक्शन तोडण्याची मोहीम हाती घेतली आहे. पोलीस बंदोबस्त मिळताच पालिकेच्या पथकाने शहानुरमिया चौकातील संग्रामनगर उड्डाणपुलाखालील दीडशे मिमी आणि दोनशे मिमी व्यासाच्या पाईपलाइनवरील ५२ अनधिकृत नळजोडण्या तोडल्या.

उच्च न्यायालयाने शहरातील बेकायदा नळ तोडण्याची मोहीम राबवण्याचे आदेश पालिकेला दिले आहे. त्यानुसार पालिका प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी शहरातील अनधिकृत नळ तोडण्याची मोहीम राबवण्यासाठी तीन पथके स्थापन केली. मुख्य लेखाधिकारी संतोष वाहुळे यांचे एक पथक, अतिरिक्त आयुक्त रवींद्र निकम यांचे दुसरे पथक आणि उपायुक्त राहूल सुर्यवंशी यांचे तिसर्या क्रमांकाचे पथक याप्रमाणे पथकांना अनधिकृत नळ तोडण्याचे आदेश दिले. त्यानुसार पथकांनी कारवाई सुरू केली आहे. अनधिकृत नळ तोडण्याची मोहीम राबवण्यासाठी पोलीस बंदोबस्त मिळताच मुख्य लेखाधिकारी संतोष वाहुळे यांच्या पथकाने शनिवारी शहानुरमिया दर्गा चौकातील संग्रामनगर उड्डाणपुलाच्या खालून गेलेल्या १५० मिमी व २०० मिमी व्यासाच्या पाईपलाइनवरील अनधिकृत नळ तोडण्याची मोहीम राबविण्यात आली. या भागात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत नळ घेतले असल्याची माहिती पथकाला मिळाली होती.


**ADOR MULTI PRODUCTS LIMITED**

Regd. Off : Ador House, 5th Floor, 6 K Dubash Marg, Fort Mumbai - 400 001
CIN:L85110MH1948PLC310253 Website : www.adormultiproducts.com E-mail : cs.adormultiproducts@gmail.com

EXTRACT OF STANDALONE AND CONSOLIDATED FINANCIAL RESULTS FOR THE HALF YEAR AND QUARTER ENDED SEP 30, 2022 (₹ In lakh Except EPS)

| SL No | Particulars | Standalone | | | | | Consolidated | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | For the Quarter Ended | | For the Half Year | | Year Ended | For the Quarter Ended | | For the Half Year | | Year Ended |
| | | 30.09.2022 (Unaudited) | 30.06.2022 (Unaudited) | 30.09.2022 (Unaudited) | 30.09.2021 (Unaudited) | 31.03.2022 (Audited) | 30.09.2022 (Unaudited) | 30.06.2022 (Unaudited) | 30.09.2022 (Unaudited) | 30.09.2021 (Unaudited) | 31.03.2022 (Audited) |
| 1. | Total Income from Operations | 134.60 | 144.77 | 279.37 | 381.58 | 720.81 | 301.60 | 368.79 | 670.39 | 658.37 | 1343.67 |
| 2. | Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items#) | (26.43) | (33.27) | (59.70) | (50.60) | (64.15) | (153.43) | (230.88) | (384.31) | (290.48) | (680.70) |
| 3. | Net Profit / (Loss) for the period before tax(after Exceptional and/or Extraordinary items#) | (26.43) | (33.27) | (59.70) | (50.60) | (64.15) | (153.43) | (230.88) | (384.31) | (290.48) | (680.70) |
| 4. | Net Profit / (Loss) for the period after tax(after Exceptional and/or Extraordinary items#) | (26.43) | (33.27) | (59.70) | (50.60) | (76.76) | (153.43) | (230.88) | (384.31) | (290.48) | (693.32) |
| 5. | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period(after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | (26.43) | (33.27) | (59.70) | (49.77) | (75.48) | (153.43) | (230.88) | (384.31) | (289.65) | (692.50) |
| 6. | Equity Share Capital | 467.36 | 467.36 | 467.36 | 467.36 | 467.36 | 467.36 | 467.36 | 467.36 | 467.36 | 467.36 |
| 7. | Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year | | | | | 1046.61 | | | | | 1,606.89 |
| 8. | Earnings Per Share (of Rs. 10/- each) (for continuing and discontinued operations) - Basic: | (0.57) | (0.71) | (1.28) | (1.06) | (1.62) | (3.28) | (4.94) | (8.22) | (6.20) | (14.82) |
| | Diluted: | (0.57) | (0.71) | (1.28) | (1.06) | (1.62) | (3.28) | (4.94) | (8.22) | (6.20) | (14.82) |

Note:
1.The above is an extract of the detailed format of Quarterly Financial Results for the Half Year and Quarter ended 30 Sep, 2022 filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly/Annual Financial Results are available on the websites of the Stock Exchange **www.bseindia.in** and the listed entity www.adormultiproducts.com
2. The above Financial Results duly reveiwed by Audit Committee, have been approved at the meeting of the Board of Directors held on Nov 4, 2022
3.Previous Period's figures have been re-grouped wherever necessary to facilitate comparison.

For Ador Multi products Ltd.
Sd/-
Deep A Lalvani
Chairman & Director

Place: Mumbai
Date: 4th November, 2022